**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक:-24/08/2020**

**1) श्रीमती संजीवनी शिवानंद स्वामी, वय 32 वर्ष, तलाठी, तलाठी सज्जा वडगाव (लाख), 2) श्री.सुभाष नागनाथ मोटे, वय 48 वर्ष, रा.कारला, ता.तुळजापुर, जि. उस्मानाबाद (तलाठी यांचे खाजगी लेखनीक) यांनी 8,000/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद च्या जाळयात**

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा व पत्ता | 1) श्रीमती संजीवनी शिवानंद स्वामी, वय 32 वर्ष, तलाठी, तलाठी सज्जा वडगाव (लाख), ता.तुळजापुर, जि. उस्मानाबाद 2) श्री.सुभाष नागनाथ मोटे, वय 48 वर्ष, रा.कारला, ता.तुळजापुर, जि. उस्मानाबाद (खाजगी ईसम- तलाठी यांचे खाजगी लेखनीक) |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दि.24.08.2020 रोजी तलाठी कार्यालय तुळजापुर येथे |
| तपासी अधिकारी | श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद |
| लाचेची रक्कम मागणी | 8,000/- रु लाचेची मागणी केली व 8,000/- रु लाच रक्कम स्विकारली. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार व त्यांचे भाऊ यांनी 100/- रु चे स्टॅपवर करुन घेतलेल्या वाटणीपत्राआधारे फेर मंजुर करुन 7/12 ला नोंद घेण्यासाठी |

यातील तक्रारदार हे शेती व्यवसाय करीत आहेत. तक्रारदार व त्यांचे भाऊ यांनी मौजे जवळगा मेसाई ता.तुळजापुर येथे त्यांचे आईचे नावावर असलेल्या शेत गट नंबर 329 मधील क्षेत्र 4 हेक्टर 6 आर व तक्रारदार यांचा भाऊ यांचे नावावर असलेल्या शेत गट नंबर 244 मधील 26 आर व शेत गट नंबर 246 मधील 17 आर या शेत जमीनीचे 100/- रु चे स्टॅपवर करुन घेतलेल्या वाटणीपत्राआधारे फेर मंजुर करुन 7/12 ला नोंद घेण्यासाठी तलाठी सज्जा वडगाव (लाख) येथील तलाठी श्रीमती स्वामी व त्यांचे खाजगी लेखनीक श्री.मोटे यांनी तक्रारदार यांचेकडे 8,000/- रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना श्रीमती स्वामी, तलाठी व त्यांचे खाजगी लेखनीक श्री.मोटे यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि.24.08.2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद येथील पोलीस उप अधीक्षक श्री.प्रशांत संपते यांचेकडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने श्रीमती स्वामी, तलाठी व त्यांचे खाजगी लेखनीक श्री.मोटे यांची लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे वरील नमुद कामासाठी दि.24.08.2020 रोजी पंचासमक्ष 8,000/-रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम लागलीच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे दि.24.08.2020 रोजी सापळा आयोजीत केला असता श्रीमती संजीवनी शिवानंद स्वामी, वय 32 वर्ष, तलाठी, तलाठी सज्जा वडगाव (लाख), ता.तुळजापुर, जि. उस्मानाबाद यांनी तुळजापुर येथे तलाठी कार्यालयामध्ये तक्रारदार यांच्याकडुन लाचेच्या मागणीप्रमाणे 8,000/- रुपये लाच रक्कम त्यांचे खाजगी लेखनीक श्री.सुभाष नागनाथ मोटे, वय 48 वर्ष, रा.कारला, ता.तुळजापुर, जि. उस्मानाबाद (खाजगी ईसम) यांच्या मार्फत स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. यावरुन त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे तुळजापुर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री.अरविंद चावरीया, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.अनिता जमादार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद यांनी केली असुन सदर कारवाईस पोह/रविंद्र कठारे, पोह/दिनकर उगलमुगले, पोना/मधुकर जाधव, पोशि/विष्णु बेळे, पोशि/तावसकर व चालक दत्तात्रय करडे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी 1) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती 2) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net** या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

**मोबाईल क्रमांक :-**

**1)** मा.श्री.अरविंद चावरीया, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. 8530255500

**2)** श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. 9527943100,

**3) टोल फ्री क्र. 1064**, दूरध्वनी क्र.- 02472-222879

**E-Mail ID:-**dyspacbosmanabad@mahapolice.gov.in, 2)dysposmanabad@gmail.com

(प्रशांत संपते)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद.